# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

दैनिक ऐक्य, सातारा.

# समाजाचे देणे लागतो, या भावनेतून केलेले कार्य चिरंतन टिकते : विक्रमसिंह पाटणकर

▲पाटण, दि. १९ : जीवनात एखादे ध्येय समोर ठेवून आणि त्या ध्येयाने प्रेरित होऊन कष्ट केले तर यश नक्कीच साध्य करता येते. मात्र हे यश मिळवत असताना समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी विसरता कामा नये. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून केलेले कार्यच चिरंतन टिकते, असे प्रतिपादन माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी केले.

येथील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात प्राचार्य डॉ. शिरीषकुमार पवार यांच्या सेवापूर्ती सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण, पृथ्वीराज पाटील, प्र. प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे, ॲड. संभाजीराव मोहिते, प्रा. डॉ. सिकंदर जमादार यांची प्रमुख उपस्थिती होती.

विक्रमसिंह पाटणकर म्हणाले, आजच्या काळात चांगल्या विचारांची देवाणघेवाण होणे अत्यंत गरजेचे आहे. यातून चांगल्या विचारांची माणसे तयार होतील. समाजातील वंचित आणि गोरगरीब घटकाला सन्मान मिळवून देणे हे सुशिक्षित समाजाचे आद्य कर्तव्य आहे. चांगला समाज घडवण्यासाठी केवळ घोषणा करून उपयोग नाही तर समाजातील चांगल्या आणि सज्जन माणसांनी आपला अमूल्य वेळ समाजासाठी दिला पाहिजे. ध्येयाने प्रेरित होऊन केलेले कष्ट आणि समाजाप्रती असलेली कृतज्ञतेची भावना हीच यशाची खरी सूत्रे आहेत.



मार्गदर्शन करताना विक्रमसिंह पाटणकर, व्यासपीठावर डॉ. अभयकुमार साळुंखे, अमरसिंह पाटणकर, डॉ. सुहास देशमुख, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण व मान्यवर. (आराधना फोटोज, पाटण)

प्राचार्य डॉ.अभयकुमार साळुंखे म्हणाले, जीवनात यश मिळवण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नसते तर आपल्या कामावर आपली नितांत श्रद्धा असणे आवश्यक आहे. वादात वेळ घालवण्यापेक्षा आपल्या कामावर लक्ष केंद्रित केले तर मोठी उद्दिष्टे साध्य होतात. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता संशोधनाकडे वळावे. जीवनात शिस्त असेल तरच आपण ध्येयापर्यंत पोहोचू शकतो. आपल्याला आयुष्यात जे काही यश मिळते त्यामागे आई-वडिलांनी केलेले संस्कार आणि कष्टाची मोठी शिदोरी असते.

सत्कारास उत्तर देताना प्राचार्य शिरीषकुमार पवार म्हणाले, जेथे काम करतो तेथे प्रामाणिक काम करायचे हा संदेश मला माझ्या वडिलांनी दिला होता. त्याचे पालन मी नेहमी केले. विद्यार्थी हित डोळ्यासमोर ठेऊन काम केले.

या सेवापूर्ती सोहळ्यात अनेक मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. संस्थेचे संचालक संजीव चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. दीपक पाटील आणि प्रा. सौ. पोर्णिमा मोरे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास कोयना एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.